आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१७ सप्टेंबर २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सेवापर्वाच्या अंतर्गत महिलांच्या आरोग्य शिबिरांसाठीच्या ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ अभियानाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरुवात

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन

- प्रत्येक गावात जिल्हा बँकेमार्फत लाडक्या बहिणींना बिनव्याजी एक लाख रुपयांचं कर्ज देण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- अमळनेर ते बीड रेल्वेमार्गाचा आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेसेवेचा प्रारंभ

आणि

- गडचिरोली जिल्ह्यातल्या एटापल्लीमध्ये पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत दोन महिला नक्षलवादी ठार

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मध्य प्रदेशातल्या धार इथं महिलांसाठी ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ अभियानाचा प्रारंभ केला. नारीशक्ती हा देशाच्या प्रगतीचा मुख्य आधार असून घरातली आई तंदुरुस्त राहिली, तर संपूर्ण घर हसतं-खेळतं राहतं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं. या अभियानाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी-***

*(आजपासून २ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या अभियानांतर्गत आयुष्मान आरोग्य मंदिरं आणि सार्वजनिक आरोग्य केंद्रांमध्ये एक लाखापेक्षा जास्त आरोग्य शिबिरं आयोजित केली जाणार आहेत. महिलांमध्ये आढळणारे ॲनिमिया, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि कर्करोगासारख्या रोगांची तपासणी आणि निदान या शिबिरांमध्ये होईल. तसंच माता आणि बालमृत्यूचं प्रमाण कमी करण्यासाठी लसीकरण आणि पोषणावर भर देण्याचाही या अभियानाचा उद्देश आहे. याअंतर्गत आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरांमध्ये जाऊन स्वतःची तपासणी करून घ्यायचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी देशभरातल्या महिलांना केलं.*

***- - बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी - -***

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडमधून दूरस्थ पद्धतीनं या कार्यक्रमात भाग घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत मुंबईसह राज्यभरात स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाची सुरुवात झाली. यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले.*

***बाईट- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे***

*केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी दहिसर पूर्व इथं या अभियानाचा प्रारंभ केला. ८वा राष्ट्रीय पोषण मासाचा प्रारंभ, प्रधानमंत्री मित्र पार्कची पायाभरणी, मध्य प्रदेशात आदि सेवा पर्वाची सुरुवात, सुमन सखी चॅटबॉट यासह इतर योजनांचा प्रारंभही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज झाला.)*

<><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त आज राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं. पर्यटन विभागामार्फत राज्यातला साडे सात हजार तरुणांना प्रशिक्षण देण्याचा ‘नमो पर्यटन कौशल्य कार्यक्रम’ आणि पर्यटकांना सुविधा देणारे ‘नमो पर्यटन माहिती व सुविधा केंद्र’ पाच ठिकाणी उभारण्यात असल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. कौशल्य विकास विभागाच्या वतीने स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. राज्यातल्या ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून आणि ५०० खाजगी आयटीआय मधून हजारो विद्यार्थी आणि शिक्षकांनी ७५० गावांमध्ये स्वच्छता अभियान राबवलं.

मुंबईत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात आज मुंबई उपनगरचे पालकमंत्री आशीष शेलार यांच्या हस्ते भारतीय प्रजातीच्या ७५ दुर्मीळ वृक्षांची लागवड झाली.

<><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आत्मनिर्भर, बलशाली भारताची निर्मिती झाली आहे. २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासारख्या निर्णायक नेतृत्वाची देशाला गरज असल्याचं केंद्रीय मंत्री पियुष गोयल म्हणाले. भाजपच्या मुंबईतल्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रधानमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपातर्फे देशभर ‘सेवा पंधरवडा’ उपक्रम राबण्यात येत

असून येत्या २ ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या मोहिमेअंतर्गत रक्तदान शिबिरं, स्वच्छता मोहीम, आरोग्य तपासणी शिबिरं, वृक्षारोपण आणि प्रदर्शन असे अनेक कार्यक्रम होणार असल्याची माहिती गोयल यांनी यावेळी दिली.

<><><>

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्ली इथं एका कार्यक्रमात सेवापर्वावर आधारित दूरदर्शनसाठी विशेष कार्यक्रमांची मालिका सुरू केली. यात तीन माहितीपट आणि एका विशेष कार्यक्रमाचा समावेश आहे. संकल्प की शक्ती, सुशासन का सामर्थ्य, विश्वपटल पर नेतृत्व का शंखनाद आणि कर्मयोगी - एक अंतहीन यात्रा अशी या माहितीपटांची नावं आहेत. याव्यतिरिक्त, प्रादेशिक भाषांमधले अनेक माहितीपट देखील तयार केले गेले असून ते दूरदर्शनच्या प्रादेशिक केंद्रांद्वारे प्रसारित केले जातील, अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे.

- **- होल्ड - अश्विनी वैष्णव बाइट- -**

- <><><>

सेवा आणि सुशासन या तत्वांचं अनुसरण करीत केंद्र सरकारने गेल्या ११ वर्षांत देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा आलेख उंचावला आहे. या प्रगतीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या कार्याविषयी हिंदी चित्रपट अभिनेता शाहरुख खान म्हणाला…

- **- होल्ड.. बाईट - शाहरुख खान - -**

- <><><>

प्रत्येक गावात जिल्हा बँकेमार्फत लाडक्या बहिणींना बिनव्याजी एक लाख रुपयांचं कर्ज देऊन शासन त्यांना आर्थिक पाठबळ देईल. त्यातून उद्योग व्यवसाय करुन त्या स्वावलंबी बनतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज व्यक्त केला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या किनगाव इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना'चा शुभारंभ आज झाला. त्यावेळी ते बोलत होते.

राज्यातल्या एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवण्याचा संकल्प असल्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करुन लाभ देण्याबरोबरच प्रत्येक ग्रामस्थाला स्वाभिमानानं जगायला शिकवणारं अभियान

आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. लोकसहभाग हा या अभियानाचा गाभा असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><>

विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांमधली माहिती अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत ग्राह्य धरावी, असे निर्देश उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज मुंबईत दिले. विविध प्रवर्गांतल्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम शैक्षणिक संस्थांना आणि विद्यार्थ्यांना वेळेत मिळावी, या दृष्टीनं कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज आढावा बैठक झाली.

<><><>

जलसमृद्ध महाराष्ट्र घडवण्यासाठी सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज असल्याचं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी अधोरेखित केलं. राज्यात हाती घेण्यात येत असलेल्या नदीजोड प्रकल्पासंदर्भात गुंतवणूकदारांशी चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रात ते आज बोलत होते. राज्यात उभारण्यात येणारे सर्वच नदीजोड प्रकल्प महाराष्ट्रासाठी परिवर्तनकारी ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><>

मराठवाडा मुक्तिदिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथल्या सिद्धार्थ उद्यानात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण झालं. गोदावरी खोऱ्यातली पाण्याची तूट दूर करून मराठवाड्यातल्या प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचवण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. राज्याच्या विविध नद्यांमधलं वाहून जाणारं पाणी गोदावरी खोऱ्यात वळवलं जाणार असून, या कामाला पुढच्या सहा महिन्यात प्रत्यक्ष प्रारंभ होणार असल्याचं ते म्हणाले –

**बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मराठवाड्यात उद्योग, पाणी पुरवठा, रस्ते बांधणी आदी क्षेत्रात होणाऱ्या विकासकामांचा मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला.

मराठवाड्यातल्या इतर जिल्ह्यातही यासंदर्भात विविध कार्यक्रम झाले.

<><><>

अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ ब्रॉडगेज रेल्वे प्रकल्पाच्या अंमळनेर ते बीड या टप्प्याचं उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेसेवेचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झाला. बीडच्या सर्वांगीण विकासासाठी पक्ष, जात, धर्म इत्यादी गोष्टी विसरून एकत्र काम करू या, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं. या मार्गाच्या विद्युतीकरणाचं काम पुढच्या ३ ते ४ महिन्यांत पूर्ण होईल, असं आश्वासन देऊन, ही गाडी विजेच्या इंजिनावर धावेल तेव्हा वेग वाढेल आणि प्रवासाचे तासही कमी होतील, असं ते म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार बजरंग सोनावणे, रजनी पाटील, आमदार पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, रेल्वेचे अधिकारी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या एटापल्ली तालुक्यात मोडस्के जंगलात आज दुपारी झालेल्या चकमकीत पोलिसांनी दोन नक्षली महिलांना ठार केलं. पोलिसांनी घटनास्थळावरुन स्वयंचलित रायफलीसह मोठ्या प्रमाणावर दारुगोळा आणि अन्य साहित्य ताब्यात घेतलं आहे. मृतदेहांची ओळख पटवण्याचं काम सुरु असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिली.

गडचिरोली पोलिसांनी गेल्या २१ दिवसांत झालेल्या दोन चकमकीत ६ नक्षलवाद्यांना ठार केलं आहे.

**<><><><>**

जीएसटी परिषदेनं अनेक वस्तू आणि क्षेत्रांमधले जीएसटीचे दर कमी केले आहेत. त्यात नवीकरणीय ऊर्जेसाठी लागणाऱ्या विविध घटकांवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्के झाला आहे. या सुधारणांमुळे छतांवर लावण्यात येणारी सौरयंत्रणा, सौरपंप आणि तत्सम इतर उपकरणांची किंमतही कमी होईल, ज्यामुळे शेतकरी, उद्योग आणि विकासकांना फायदा होऊन देशाच्या हरित ऊर्जा परिवर्तनाला चालना मिळेल. नवीन जीएसटी दर येत्या २२ तारखेपासून लागू होणार आहेत.

**<><><><>**

**हिंगोली** जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी आज जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीची पाहणी केली. प्रशासनानं तातडीनं  नुकसानीचे पंचनामे करावेत

अशा सूचना त्यांनी दिल्या. वसमत तालुक्यातल्या गुंडा इथं ओढ्याला आलेल्या पुरात वाहून गेलेल्या २ महिलांच्या कुटुंबियांची झिरवळ यांनी भेट घेतली.

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या **अहिल्यानगर** जिल्ह्यातल्या कर्जत तालुक्यातल्या गावांना विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज भेट देऊन नुकसानीचा आढावा घेतला.

<><><><>

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही त्यात अतिवृष्टीमुळे शेतातलं पीक देखील हातातून गेलं आहे. त्यामुळे बळीराजा अडचणीत आला आहे. म्हणून राज्य सरकारनं शेतकऱ्यांना तातडीनं मदत करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

<><><><>

राज्यातल्या बंजारा अर्थात लमाण समाजाला इतर राज्यांमधल्या बंजारा समाजाप्रमाणे अनुसूचित जमातीचे दाखले तसंच सुविधा मिळाव्यात या मागणीसाठी सोलापूर जिल्ह्यातल्या बंजारा समाजानं आज जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. काल सुद्धा अशाच प्रकारचा मोर्चा निघाला होता.

<><><><>

मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी लागू केलेले हैद्राबाद गॅझेट रद्द करा या प्रमुख मागणीसाठी ओबीसी बांधवांनी आज हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी इथं भव्य एल्गार मोर्चा काढला होता. ओबीसींवर होणार अन्याय सहन केला जाणार नाही, आरक्षणाबाबत कुणाचीही अरेरावी सहन केली जाणार नाही, असा इशारा यावेळी ओबीसी नेत्यांनी दिला.

<><><><>

राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासंदर्भातला अहवाल ५ डिसेंबरपर्यंत सादर करण्याचा मानस असल्याचं समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी आज मुंबईत सांगितलं. त्रिभाषा सुत्र समितीद्वारे वेबसाईट आणि विशेष लिंक तयार करण्यात येणार आहे. त्यावर त्रिभाषा धोरण संदर्भात मत मांडता येईल, असं ते म्हणाले. प्रश्नावली

तयार करण्याचं काम सुरू आहे. ही प्रश्नावली संबंधितांना पाठवली जाईल. राज्यातल्या ८ शहरात जाऊन स्थानिकांच्या तसंच राजकीय नेत्यांची भेटीही घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><>

राज्यात काल तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस झाला. राज्यात येत्या २ दिवसात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे. राज्यात काही ठिकाणी मेघ गर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याचं वेधशाळेनं कळवलं आहे.

//<><><><>//